# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २३/०६/२०२२ (गुरूवार)**

**(दुपार)**

---

### गळफास लावून मृत्यु

१) पो.स्टे. बोरी :— अंतर्गत ०२ कि.मी अंतरावरील वार्ड क्रं ०४ सातगांव दुधाळा येथे दिनांक २२/०६/२०२२ दरम्यान **सौ वैषाली अरविंद डाकरे (मृतक), वय ३३ वर्ष रा.वानाडोंगरी, त.हिंगणा जि.नागपुर ह मु सातगांव दुधाळा सुदर्शन गौरकार** हि घरकाम करित होती. तिचे पती फिर्यादी हे खाजगी कंपनीमध्ये मिळेल तेव्हा कंपनिचे काम करतात. त्यांचा मासीक मिळकत ७००० रू असुन त्यामध्ये कुटुंबाचा उदरनिर्वाह होत असतो. मुलगा दैविक वय ३ वर्ष याचा शाळेत प्रवेशासाठी फिर्यादी यांनी इसाफ बँकेकडुन कर्ज घेतले होते. परंतु एवढे कर्ज कसे फेडनार तसेच वेळोवेळी पती ला कोणत्याही प्रकारचे काम मिळत नसल्याने मृतक महिलेला मनस्ताप झाला असावा. फिर्यादी हे त्यांचे मुलासह घरगुती किराणा घेण्याकरिता घराबाहेर गेले व घरी परत आले असता त्यांची पत्नी मृतक ही राहत असलेल्या घरी बाळाच्या पाळण्याच्या दोरीला ओढणीने गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसुन आली. फिर्यादी यांनी तिला माया हॉस्पीटल येथे दाखल केले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोशित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— अरविंद हीरीभाउ डाकरे, वय ४३ वर्ष रा. वानाडोंगरी, त.हिंगणा जि.नागपुर ह मु सातगांव दुधाळा सुदर्शन गौरकार यांचे घरी किरायाने यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. बोरी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार असलम नौरंगाबादे मो.नं. ८६६८८१६०४९ हे करीत आहे.

२) पो.स्टे. पारशिवनी :— अंतर्गत ०१ कि.मी अंतरावरील मौजा बारई तलाव अमराई पारशिवनी येथे दिनांक २२.०६.२२ दुपारी चे १५/०० वा. दरम्यान **हरीभाउ गणपत धुरई, वय ६४ वर्ष रा. प्रभाग क्र. ६ पारशिवनी** यांची प्रकृती खराब राहात असल्याने त्यांनी बारई तलाव अमराई येथे वडाच्या झाडाला दोरीने गळफास घेतल्यानंतर ते मृत अवस्थेत आढळून आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सतिश विष्णुजी धुरई, वय ४० वर्ष, रा. प्रभाग क्र. ६ पारशिवनी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. पारशिवनी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार जयंत शेरेकर मो.क्र. ८८३०५०९४४१ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर